RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१६)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLVII OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND BOARDING WHICH TEND TO INSTIGATE SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७.**

**महाराष्ट्र राज्यात लैंगिक अपराधास प्रवृत्त करणाऱ्या व जाहिराती व जाहिराती फलक लावण्यास तसेच या संदर्भातील अनेक संकेतस्थळांवर व समाज माध्यमांवर प्रतिबंध करण्यास तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** मासिके, नियतकालिके व समाज माध्यमे यामधील फायदा मिळविण्यास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती तसेच काही संकेतस्थळे स्त्री देहांचे प्रदर्शन करणारी व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणारी चित्रे, ही परिणामी महिलांची टिंगल-टवाळी करण्यास, महिलांवर बलात्कार आणि अन्य लैगिंक अपराध करण्यास प्रेरणा देत आहेत, आणि **ज्याअर्थी** सध्याच्या कायदेशीर उपाययोजनांच्या आधारे जाहिरातींवर, सोशल मिडीयावर व वेबसाईटवर बंदी घालणे शक्य झालेले नाही;

**त्याअर्थी,** आता, महाराष्ट्र राज्यात अशा जाहिरातींवर, समाज माध्यमे व संकेतस्थळांवर बंदी आणणे इष्ट आहे.

संक्षिप्त नाव व व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जहिराती फलक लावण्यास, समाज माध्यमावर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम २०२५, असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू येईल.

(३) तो राज्यास शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चित करील त्या तारखेस अंमलात येईल.

**२.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अशा जाहिरातीमध्ये, सोशल मिडीयामध्ये व वेबसाईटमध्ये समाविष्ट केलेला किंवा अंतर्भूत केलेला मजकूर, जे लोक वाचण्याचा, पाहण्याचा संभव असेल किंवा असा मजकूर ज्याच्या कानावर पडण्याचा संभव असेल अशा व्यक्तींच्या लैंगिक प्रवृत्ती ज्या मजकुरामध्ये किंवा हावभावामुळे उद्दिपित होऊ शकतील किंवा ज्यामुळे त्यांच्या प्रक्षोभक भावनांना चिथावणी मिळू शकेल असा मजकूर किंवा हावभाव यांचा समावेश जाहिराती, जाहिराती फलक लावणाऱ्यावर तसेच सोशल मिडीया व वेबसाईटवर याद्वारे बंदी घालण्यात येत आहे.

(२) जो कोणी,—

(अ) पोट-कलम (१) अन्वये बंदी घातलेले कोणतेही पत्रक, वृत्तपत्र रेखाचित्र, रंगचित्र किंवा आकृती किंवा इतर कोणत्याही वस्तु यांचे जाहीरपणे प्रदर्शन करील, विक्री करील, भाड्याने देईल, वितरित करील किंवा तो कोणत्याही मार्गाने प्रसृत करील किंवा ते विकणे, भाड्याने देणे, त्यांचे वितरण करणे, जाहीर प्रदर्शन करणे किंवा ते प्रसृत करणे यांच्या प्रयोजनासाठी अशी वस्तू तयार करील, तिथे उत्पादन करील किंवा तो स्वतःच्या ताब्यात ठेवील, किंवा

(ब) जो कोणताही धंदा करीत असताना त्यास हे माहित असेल किंवा माहित असल्यास कारण असेल की, कोणत्याही अशा बंदी घातलेल्या गोष्टी या उपरोक्तपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येत आहेत, उघडपणे वाहून नेण्यास येत आहेत, प्रदर्शित करण्यात येत आहेत किंवा कोणत्याही रीतीने प्रसृत करण्यात येत आहे, अशा धंद्यात किंवा त्यातून नफा मिळवित असेल, किंवा

(३) या अधिनियमान्वये बंदी घातलेली कोणती कृती करण्याचे कबूल करील किंवा ती कृती करण्याचा प्रयत्न करील :

अशा व्यक्तीस पहिला गुन्हा घडल्यानंतर पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीसाठी कारावासाची आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल, एवढ्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी दहा वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची तसेच पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडांची शिक्षा देण्यात येईल.

(४) कलम ३ अन्वये शिक्षापात्र अपराध दखलपात्र असतील.

(५) प्रस्तुत अधिनियमान्वये जनजागृतीसाठी कोणतीही गोष्ट करणाऱ्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही व्यक्तींवर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई करण्यात येणार नाही.

(६) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात अणण्यासाठी **शासकीय राजपत्रात** अगोदर प्रकाशित करण्याच्या शर्तींच्या अधीन राहून नियम करील.

(७) या अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल व अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्या गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

सध्या महिलांच्या देहाचे अश्लिल चित्रण दाखविणारे उत्साहवर्धक औषधे घेणाऱ्या जाहिराती, मासिके व दैनिक यांमधून सर्रास आढळतात, तसेच सोशल मिडिया व वेबसाईट यांमधून सुद्धा सर्रास आढळतात. विशेषतः व्यावसायिक दृष्टीकोनातून केवळ नफ्याकडे डोळा ठेवून प्रदर्शित केल्या जाणाऱ्या जाहिरात-फलकांवर तसेच सोशल मिडिया-वेबसाईटवर या गोष्टी प्रामुख्याने आढळतात. परिणामी, लोकांमध्ये त्याबद्दल उत्सुकता किंवा आकर्षण वाढू लागले आहे. अश्लिल प्रकारांनी केल्या जाणाऱ्या या व्यावसायिक जाहिराती आणि प्रसार माध्यमातून लहान मुलांची आणि कोवळ्या तरुणांची अभिरुची बिघडत चालली आहे. निव्वळ पैसा मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवून आपल्या उत्पादनाची येनेकेन प्रकारे जाहिरातबाजी करणाऱ्यांनी, उत्पादनाशी अर्थाअर्थी काहीही संबंध नसतांना प्रत्येक जाहिरातीत तसेच सोशल मिडिया व वेबसाईटवर स्त्री-देहाचे भडक प्रदर्शन मांडून तरुणांच्या भावना उद्यिपित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालवला जात आहे. त्यामुळे हिंसाचाराबरोबरच, बलात्कार, महिलांची टिंगल-टवाळी, विनयभंग इत्यादीसारख्या लैंगिक अपराधाचे प्रमाणही बरेच वाढले आहे. चित्रपटातून व दूरदर्शनवर होणारे अशा प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन हे एकवेळ तात्पुरते आणि मर्यादित प्रेक्षकवर्गापुरते असू शकेल. परंतु, जाहिरातीद्वारे होणारे बिभत्स चित्रांचे प्रदर्शन नजरेसमोर सातत्याने आणि ठळकपणे येत राहिल्याने त्याचे परिणाम अधिक गंभीर स्वरूपाचे होतात आणि त्यामुळे लैंगिक अपराधांना व अत्याचारांना प्रोत्साहन मिळते, ही गोष्ट जशी नागरी जीवनात आढळते तसेच ग्रामीण जीवनही यांच्या प्रभावापासून दूर राहू शकत नाही. म्हणून लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणारी चित्रे प्रदर्शित करण्यास ताबडतोब बंदी घालणे आवश्यक आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :-

**खंड १(३)**—या खंडाद्वारे, हा अधिनियम, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**खंड ७.**—या खंडाद्वारे, राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.